जनसंपर्क कक्ष
01 APR 2023 तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समाजहिताच्या प्रश्नावर शिक्षकांनी सरकारला मार्गदर्शन करावे

## प्रा. सुखदेव थोरात : शिवाजी विद्यापीठात 'डॉ. जे. एफ. पाटील स्मृती पुरस्कारा'चे वितरण



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा पहिला डॉ. जे. एफ. पाटील स्मृती पुरस्कार ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. सुखदेव थोरात यांना शुक्रवारी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सोबत कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. राहुल म्होपरे, प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. विद्या कट्टी.**

प्रतिनिधी
कोल्हापूर

संपादित केलेल्या ज्ञानाच्या आधारे सरकारला व्यापक व सामाजिक हिताच्या प्रश्नांवर मार्गदर्शन करणे ही शिक्षकांची जबाबदारी आहे, ही जबाबदारी त्यांनी निर्भयपणे निभावावी, असे प्रतिपादन विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी चेअरमन प्रा. सुखदेव थोरात यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ व अर्थशास्त्र परिषदेच्या संयुक्त विद्यमाने पहिला प्रा. डॉ. जे. एफ. पाटील स्मृती पुरस्कार प्रा. सुखदेव थोरात यांना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी प्रा. थोरात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. शिर्के होते. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. शिवाजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात शुक्रवारी सायंकाळी हा कार्यक्रम झाला.

प्रा. थोरात म्हणाले, स्व. डॉ. जे. एफ. पाटील यांच्या जीवनकार्यापासून ज्ञानसंपादनाचा आणि ते समाजाला देण्याचा धडा शिक्षकांनी घ्यावा. वेगवेगळ्या परिस्थितीत व्यक्तिस्वातंत्र्य, लेखन, अभिव्यक्तीवर मर्यादा येत असतात. परंतु अशा काळात शिक्षकांनी आपली समाजशिक्षकाची भूमिका बजावली पाहिजे. डॉ. जे. एफ. पाटील यांनी अर्थसंकल्पापलिकडेही विविध सामाजिक–आर्थिक विषयांवर समतोल मांडणी व प्रबोधन केले. डॉ. पाटील यांचा हा वारसा चिरंतन राहील, असे गौरवोद्‌गार त्यांनी काढले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठामध्ये सेवा बजावलेल्या शिक्षकाच्या नावे देण्यात येणारा हा पहिलाच पुरस्कार आहे. डॉ. जे. एफ. पाटील यांनी समाजाशी निगडित विविध प्रश्नांवर चिंतनपूर्ण मांडणी केली, असे त्यांनी सांगितले.

अर्थशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. विद्या कट्टी यांनी स्वागत केले. डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी प्रा. थोरात यांचा परिचय करून दिला. अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. राहुल म्होपरे यांनी प्रास्ताविक करून मानपत्राचे वाचन केले. शीतल माने यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. जे. एफ. पाटील यांच्या पत्नी कमल पाटील कुटुंबियांसह उपस्थित होत्या. माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखेंसह अर्थशास्त्राचे आजी–माजी शिक्षक, परिषदेचे सदस्य, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

01 APR 2023

लोकमत

सुखदेव थोरात यांचे प्रतिपादन : प्रा. डॉ. जे. एफ. पाटील स्मृती पुरस्काराने सन्मान

# सरकारला निर्भयपणे मार्गदर्शन ही शिक्षकाची जबाबदारी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** संपादित केलेल्या ज्ञानाच्या आधारे सरकारला व्यापक सामाजिक हिताच्या प्रश्नांवर मार्गदर्शन करणे शिक्षकांची जबाबदारी आहे. ती निर्भयपणे निभावली पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष प्रा. सुखदेव थोरात यांनी शुक्रवारी केले. शिवाजी विद्यापीठ व अर्थ परिषदेच्या वतीने प्रा. डॉ. जे.एफ. पाटील स्मृती पुरस्कार प्रा. थोरात यांना शुक्रवारी सायंकाळी शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी सत्काराला उत्तर देताना प्रा. थोरात बोलत होते.



कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी पहिला डॉ. जे. एफ. पाटील स्मृती पुरस्कार ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. सुखदेव थोरात यांना कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. राहुल म्होपरे, प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, डॉ. विद्या कट्टी उपस्थित होत्या.

प्रा. थोरात म्हणाले, डॉ. जे. एफ. पाटील यांच्या जीवनकार्यापासून एक धडा शिक्षकांनी घेतला पाहिजे. वेगवेगळ्या परिस्थितीत व्यक्ती स्वातंत्र्यावर, लेखनावर, अभिव्यक्तीवर मर्यादा येतात. अशावेळी शिक्षकांनी ठाम राहिले पाहिजे. डॉ. पाटील यांनी ज्ञानाचा उपयोग अत्यंत गांभीर्यपूर्वक व प्रामाणिकपणे समाजहितासाठी केला. विविध सामाजिक, आर्थिक विषयांवर चिंतनपर समतोल मांडणी केली.

अर्थशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. विद्या कट्टी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी परिचय, तर अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. राहुल म्होपरे यांनी पुरस्कारामागील भूमिका स्पष्ट केली. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन शीतल माने यांनी केले.

## शिक्षकाच्या नावे पहिलाच पुरस्कार

शिवाजी विद्यापीठामध्ये सेवा बजावलेल्या शिक्षकाच्या नावे देण्यात येणारा हा पहिलाच पुरस्कार आहे. डॉ. जे.एफ. पाटील यांनी समाजाशी निगडित विविध प्रश्नांवर धाडसी आणि चिंतनपूर्ण मांडणी केली. त्यामुळे समाजाशी जोडला गेलेला एक अर्थतज्ज्ञ असे त्यांचे वर्णन करावे लागेल, असे मत अध्यक्षीय भाषणात कुलगुरु डॉ. शिर्के यांनी मांडले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 APR 2023
सकाळ

# शिक्षकांनी समाजशिक्षकाची भूमिका निभवावी

## डॉ. सुखदेव थोरात; विद्यापीठातर्फे डॉ. जे. एफ. पाटील स्मृती पुरस्काराने सन्मान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३१ : 'वेगवेगळ्या परिस्थितीत व्यक्तीस्वातंत्र्य, लेखन, अभिव्यक्तीवर मर्यादा येत असतात; परंतु अशा काळातही शिक्षकांनी आपली समाजशिक्षकाची भूमिका सोडता कामा नये. विविध सामाजिक-आर्थिक विषयांच्या अनुषंगाने सरकारला मार्गदर्शन करत रहावे. नवे शैक्षणिक धोरण, शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण आदी शैक्षणिक बाबींच्या संदर्भातही अशा मार्गदर्शनाची जबाबदारी त्यांनी निभावावी', असे आवाहन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. सुखदेव थोरात यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठ आणि विद्यापीठ अर्थशास्त्र परिषदेतर्फे 'प्रा. डॉ. जे.एफ. पाटील स्मृती पुरस्कार' कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते डॉ. थोरात यांना प्रदान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. रोख ५१ हजार रुपये, मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप होते. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहातील या पुरस्कार वितरणावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा पहिला डॉ. जे. एफ. पाटील स्मृती पुरस्कार ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. सुखदेव थोरात यांना शुक्रवारी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी शेजारी (डावीकडून) कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. राहुल म्होपरे, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, अर्थशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. विद्या कट्टी उपस्थित होत्या.**

डॉ. थोरात म्हणाले, 'डॉ. जे. एफ. पाटील यांच्या जीवनकार्यापासून शिक्षकांनी ज्ञानसंपादनाचा आणि ते समाजाला वाटण्याचा धडा घेणे आवश्यक आहे. शिक्षक ज्ञानाच्या क्षेत्रात असल्यामुळे त्याला इतरांपेक्षा लवकर ज्ञान मिळते. ते ज्ञान समाजाच्या हितासाठी द्यावे. आपल्या संपादित ज्ञानाच्या आधारे सरकारला व्यापक सामाजिक हिताच्या प्रश्नांवर मार्गदर्शन करणे शिक्षकांची जबाबदारी आहे.' कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठामध्ये सेवा बजावलेल्या शिक्षकाच्या नावे देण्यात येणारा हा पहिलाच पुरस्कार आहे. डॉ. जे. एफ. पाटील यांनी समाजाशी निगडित विविध प्रश्नांवर धाडसी आणि चिंतनपूर्ण मांडणी केली. त्यामुळे ते समाजाशी जोडले गेलेले अर्थतज्ज्ञ होते.' कार्यक्रमास कमल पाटील, डॉ. माणिकराव साळुंखे, भालबा विभूते, डी. यू. पवार आदी उपस्थित होते.

अर्थशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. विद्या कट्टी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी प्रा. थोरात यांचा परिचय करून दिला. अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. राहुल म्होपरे यांनी पुरस्कारामागील भूमिका स्पष्ट केली व मानपत्राचे वाचन केले. शितल माने यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

### डॉ. जे. एफ. पाटील यांचा

- 'डॉ. जे. एफ. पाटील यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग अत्यंत गांभीर्यपूर्वक व प्रामाणिकपणे समाजहितासाठी केला. त्यांनी अर्थसंकल्पापलीकडेही विविध सामाजिक-आर्थिक विषयांवर चिंतनपर समतोल मांडणी केली, प्रबोधन केले. काही व्यक्ती आयुष्यभर लोकांच्या जीवनात परिवर्तन आणण्यासाठी मोठा झगडा मांडतात, त्या जनमानसात चिरंतन राहतात. त्यांच्या माघारी त्यांचा हा वारसा समाजाला प्रेरित करीत राहतो. डॉ. पाटील यांचा वारसा हा असा चिरंतन राहील', असे डॉ. थोरात यांनी सांगितले.

01 APR 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षकांचे ज्ञानदान समाजासाठी दिशादर्शक

## डॉ. सुखदेव थोरात : शिवाजी विद्यापीठाचा पहिला डॉ. जे. एफ. पाटील स्मृती पुरस्कार प्रदान समारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ज्ञानाच्या आधारे शिक्षकांनी भविष्यात समाजहितासाठी सरकारचे मार्गदर्शक बनले पाहिजे. वेगवेगळ्या परिस्थितीत व्यक्ती स्वातंत्र्यावर, लेखनावर, अभिव्यक्तीवर मर्यादा येत असतात; परंतु अशा काळातही शिक्षकांनी आपली समाज शिक्षकाची भूमिका सोडता कामा नये. विविध सामाजिक, आर्थिक विषयांच्या अनुषंगाने सरकारला मार्गदर्शन करीत राहिले पाहिजे. नवे शैक्षणिक धोरण, शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण आदी शैक्षणिक बाबींच्या संदर्भातही अशा मार्गदर्शनाची जबाबदारी त्यांनी निभावली पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी चेअरमन प्रा. डॉ. सुखदेव थोरात यांनी केले.



शिवाजी विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने स्थापित करण्यात आलेला पहिला 'प्रा. डॉ. जे. एफ. पाटील स्मृती पुरस्कार-२०२३' प्रा. थोरात यांना शुक्रवारी सायंकाळी शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी सत्काराला उत्तर देताना प्रा. थोरात बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते. दरम्यान, डॉ. पाटील यांच्या स्मृतिनिमित्त प्रदान करण्यात आलेल्या या पुरस्काराचे रोख ५० हजार रुपये, मानपत्र व स्मृतिचिन्ह असे स्वरूप आहे. हा पुरस्कार द्विवार्षिक असून, डॉ. पाटील यांच्या कुटुंबीयांनी दिलेल्या देणगीमूल्यातून देण्यात येणार आहे. प्रा. थोरात यांनी आपल्या भाषणात डॉ. जे. एफ. पाटील यांचे उदाहरण देत शिक्षकांवरील जबाबदारीचे अधोरेखन केले. ते म्हणाले, डॉ. पाटील यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग अत्यंत गांभीर्यपूर्वक व प्रामाणिकपणे समाजहितासाठी वापरला. त्यांनी अर्थसंकल्पापलीकडेही विविध सामाजिक-आर्थिक विषयांवर चिंतनपर समतोल मांडणी केली, प्रबोधन केले. डॉ. पाटील यांचा वारसा हा असा चिरंतन राहील, असे गौरवोद्गार प्रा. थोरात यांनी यावेळी काढले. कुलगुरू डॉ. शिर्के अध्यक्षीय मनोगतात म्हणाले, शिवाजी विद्यापीठामध्ये सेवा बजावलेल्या शिक्षकाच्या नावे देण्यात येणारा हा पहिलाच पुरस्कार आहे. डॉ. जे. एफ. पाटील यांनी केवळ अर्थशास्त्रीय विषयांच्या बाबतीतच मांडणी केली नाही, तर समाजावर प्रभाव टाकणाऱ्या त्यापलीकडीलही अनेक विषयांवर चिकित्सक प्रकाश टाकला. यावेळी अर्थशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. विद्या कट्टी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी प्रा. थोरात यांचा परिचय करून दिला. अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. राहुल म्होपरे यांनी पुरस्कारामागील भूमिका स्पष्ट केली व मानपत्राचे वाचन केले. शीतल माने यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

यावेळी डॉ. जे. एफ. पाटील यांच्या पत्नी कमल पाटील त्यांच्या कुटुंबीयांसह उपस्थित होत्या. माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्यासह अर्थशास्त्राचे आजी-माजी शिक्षक, परिषदेचे सदस्य, विविध अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

# डॉ. शिवाजीराव कदम यांना रा. कृ. कणबरकर पुरस्कार

## कुलगुरू डॉ. शिर्के : १३ एप्रिल रोजी वितरण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**



शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा 'प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार' भारती अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव श्रीपतराव कदम यांना जाहीर करण्यात आला. सिक्कीमचे माजी राज्यपाल तथा खासदार श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते येत्या १३ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता पुरस्कार प्रदान समारंभ होईल, अशी घोषणा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी पत्रकार परिषदेत केली. रुपये १ लाख ५१ हजार रोख, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

'प्राचार्य रा. कृ. पुरस्कार' त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी देण्याइतकी रक्कम त्यांच्या कुटुंबीयांनी शिवाजी विद्यापीठाकडे ठेव ठेवली आहे. पुरस्काराचे यंदा हे सहावे वर्ष आहे. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवाजी विद्यापीठाच्या प्राचार्य रा. कृ. कणबरकर राष्ट्रीय पुरस्काराच्या शोध समितीने सन २०२३ च्या पुरस्कारासाठी भारती अभिमत विद्यापीठाचे विद्यमान कुलपती प्रा. डॉ. शिवाजीराव कदम यांची एकमताने निवड केली. पत्रकार परिषदेस प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, शोध समितीचे सदस्य प्राचार्य डॉ. बी. ए. खोत उपस्थित होते.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचा कणबरकर पुरस्कार डॉ. शिवाजीराव कदम यांना जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार भारती अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम यांना जाहीर झाला आहे. सिक्कीमचे माजी राज्यपाल तथा खासदार श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते १३ एप्रिल रोजी दुपारी चार वाजता पुरस्कार प्रदान समारंभ होईल, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली. १ लाख ५१ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

प्रभावी शिक्षणतज्ज्ञ, कुशल शैक्षणिक प्रशासक, उत्साही संशोधक, तळमळीचा समाजसेवक म्हणून दिलेले योगदान लक्षात घेऊन या पुरस्कारासाठी डॉ. कदम यांची निवड केल्याचे डॉ. शिर्के यांनी सांगितले.

भारती विद्यापीठाचे प्र-कुलगुरू, कुलगुरू ते सध्या कुलपती असा



कार्यभार सांभाळणाऱ्या डॉ. कदम यांनी रसायनशास्त्रातून डॉक्टरेट मिळविली आहे. त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये १७५ हून अधिक शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य, विद्वत परिषद तसेच अधिसभा सदस्य म्हणून त्यांनी योगदान दिले आहे. औषध निर्माणशास्त्र विद्याशाखेचे पहिले अधिष्ठाता म्हणून काम पाहिले. विद्यापीठ अनुदान आयोग व फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाचे व 'नॅक'चे सदस्य म्हणून त्यांनी काम केले आहे.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, शोध समितीचे सदस्य प्राचार्य डॉ. बी. ए. खोत आदी उपस्थित होते.

सकाळ

# डॉ. शिवाजीराव कदम यांना 'रा. कृ. कणबरकर पुरस्कार'

## विद्यापीठात १३ एप्रिल रोजी होणार वितरण

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३१ : भारती अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव श्रीपतराव कदम यांना शिवाजी विद्यापीठाच्या यंदाच्या प्राचार्य रा. कृ. कणबरकर राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. खासदार श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते १३ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम होणार आहे. रोख १ लाख ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली.

यंदा पुरस्काराचे सहावे वर्ष आहे. माजी कुलगुरू डॉ. कणबरकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या कुटुंबियांनी दिलेल्या देणगीतून विद्यापीठाच्या वतीने या पुरस्काराची सुरुवात करण्यात आली. पुरस्कार शोध समितीने कुलपती डॉ. कदम यांच्या शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील कार्य, योगदानाची दखल घेऊन त्यांची एकमताने यावर्षीच्या पुरस्कारासाठी निवड केली. शिक्षणतज्ज्ञ, कुशल शैक्षणिक प्रशासक, संशोधक अशी त्यांची ओळख आहे. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये त्यांचे १७५ हून अधिक शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. युजीसी, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाचे सदस्य म्हणून त्यांचे नामनिर्देशन झाले होते. नॅकचे सदस्य म्हणून त्यांनी काम केले आहे. रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्यपदी ते कार्यरत असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, शोध समितीचे सदस्य प्राचार्य डॉ. बी.ए. खोत उपस्थित होते.



**डॉ. शिवाजीराव कदम**

लोकमत

# शिवाजीराव कदम यांना रा. कृ. कणबरकर पुरस्कार

## कुलगुरु डॉ. शिर्के : १३ एप्रिलला वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे



देण्यात येणारा 'प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार' भारती अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव श्रीपतराव कदम यांना शुक्रवारी जाहीर झाला. सिक्कीमचे माजी राज्यपाल, खासदार श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते येत्या १३ एप्रिलला दुपारी ४ वाजता सिनेट सभागृहात हा पुरस्कार प्रदान समारंभ होईल, अशी घोषणा कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी पत्रकार परिषदेत केली. १ लाख ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

डॉ. शिर्के म्हणाले, कणबरकर राष्ट्रीय पुरस्काराच्या शोध समितीने सन २०२३ च्या पुरस्कारासाठी कदम यांची एकमताने निवड केली. डॉ. कदम यांनी शिक्षण तज्ज्ञ, एक उत्साही संशोधक आणि समाजसेवक म्हणून दिलेले योगदान म्हणून त्यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्राचार्य डॉ. बी. ए. खोत उपस्थित होते.

### समाजशिक्षकाच्या नावाचा पुरस्कार हा मोठा सन्मान : कदम

- कोल्हापूर : निष्कलंक चारित्र्याच्या समाजशिक्षकाच्या नावे दिला जाणारा पुरस्कार मिळाला हा माझ्या आयुष्यातील सर्वोच्च आनंदाचा क्षण असल्याच्या भावना भारती अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम यांनी व्यक्त केल्या. 'लोकमत'शी बोलताना ते म्हणाले, शिवाजी विद्यापीठासारख्या नामांकित संस्थेतर्फे दिला जाणारा हा पुरस्कार मानाचा आहे. मला आजपर्यंत अनेक पुरस्कार मिळाले; परंतु या पुरस्काराचे मोल वेगळेच आहे.
- एक अत्यंत कर्तबगार माणूस, व्यासंगी प्राध्यापक, तत्त्वनिष्ठ कुलगुरु, समाजशिक्षक व लोकशिक्षक असलेल्या निष्कलंक चारित्र्याच्या कणबरकर सरांच्या नावाचा पुरस्कार मिळाला याचे मनस्वी समाधान आहे. कणबरकर सर अखेरचा श्वास घेईपर्यंत समाजाच्या कामात सक्रिय होते. अशा उत्तुंग व्यक्तिमत्त्वाच्या नावाशी आपण जोडले जाणे यातील आनंद वेगळाच आहे.

पुण्यनगरी

# ४९,८६३ पदवी प्रमाणपत्रे पोस्टाने रवाना

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षांत समारंभातील ४९,८६३ पदवी प्रमाणपत्रे ३० मार्च रोजी एका दिवसात परीक्षा विभागाकडून पोस्टाद्वारे पाठवण्यात आल्याची माहिती कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

बुधवारी (दि. २९ मार्च) रोजी झालेल्या दीक्षांत समारंभामध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी एकूण ६६,४५७ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. त्यापैकी १६,५९४ इतक्या विद्यार्थ्यांनी समक्ष पदवी प्रमाणपत्र स्वीकारणेसाठी अर्ज केले होते, तर ४९,८६३ इतक्या विद्यार्थ्यांनी पोस्टाद्वारे पदवी प्रमाणपत्रांची मागणी केली होती. त्या अनुषंगाने ४९,८६३ विद्यार्थ्यांची पदवी प्रमाणपत्रे पोस्टाद्वारे पाठविण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. ९,२८७ इतक्या विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी प्रमाणपत्रे स्वीकारली. ज्यांनी पदवी प्रमाणपत्रे स्वीकारली नाहीत, अशा विद्यार्थ्यांना १० दिवसांनंतर पोस्टाद्वारे पदवी प्रमाणपत्रे त्यांचे पत्त्यावर पाठविण्याबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे, असेही कुलगुरूंनी सांगितले.

पुण्यनगरी

# डॉ. बिलावर यांना 'मुक्ला'चा पुरस्कार

कोल्हापूर : महाराष्ट्र युनिव्हर्सिटी अँड कॉलेज लायब्ररीयन्स असोसिएशन (मुक्ला) मार्फत पांडुरंगजी नाल्हे स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा उत्कृष्ट संशोधन लेख पुरस्कार शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर यांना जाहीर झाला. मुक्ला व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सेक्शनल कौन्सिल यांच्यातर्फे नाशिक येथे झालेल्या संघटनेच्या सहाव्या राष्ट्रीय परिषदेमध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रशांत पाटील यांच्या हस्ते आणि मुक्लाचे अध्यक्ष डॉ. मोहन खेरडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

लोकमत

# एका दिवसात पाठविली ५० हजार पदवी प्रमाणपत्रे

## कुलगुरू : विद्यापीठाचा पोस्टाद्वारे उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षांत समारंभातील विद्यार्थ्यांना पाठवायची ४९ हजार ८६३ पदवी प्रमाणपत्रे गुरुवारी (दि.३०) परीक्षा विभागाकडून पोस्टाद्वारे पाठविण्याची प्रक्रिया पूर्ण केली, अशी माहिती कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ केंद्रीय पद्धतीने राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात झाला. यात पदवी घेण्यासाठी एकूण ६६ हजार ४५७ अर्ज केले होते. यापैकी १६ हजार ५९४ विद्यार्थ्यांनी समक्ष पदवी स्वीकारण्यासाठी अर्ज केले होते, तर ४९ हजार ८६३ विद्यार्थ्यांनी पोस्टाद्वारे पदवी प्रमाणपत्राची मागणी केली होती. त्या अनुषंगाने ४९ हजार ८६३



विद्यार्थ्यांना ही पदवी प्रमाणपत्रे पोस्टाद्वारे पाठविण्याची कार्यवाही गुरुवारी पूर्ण केली. दीक्षांत समारंभात एकूण १६ हजार ५९४ विद्यार्थ्यांपैकी ९ हजार २८७ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी स्वीकारली. उर्वरित ७ हजार ३०७ विद्यार्थ्यांनी ती स्वीकारलेली नाहीत. या विद्यार्थ्यांना मोबाईलवरून संदेश पाठवून १० दिवसांत प्रमाणपत्र नेण्याची सूचना पाठविण्यात येईल. त्यानंतरही नेली नाही, तर पुढील दहा दिवसांत ती पोस्टाद्वारे त्या विद्यार्थ्यांच्या पत्त्यावर पाठविली जाणार आहेत, असेही कुलगुरू डॉ. शिर्के यांनी स्पष्ट केले.

लोकमत

# अमेरिकेत परिसंवाद; लंगरे यांना निमंत्रण

कोल्हापूर : अमेरिकेतील जेम्स मेडिसन विद्यापीठातील महात्मा गांधी अभ्यास केंद्राच्या वतीने येत्या २७ आणि २८ सप्टेंबर २०२३ रोजी प्रा. टेरी बाइटझल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित 'बाइटझल २०२३' परिसंवादासाठी विशेष साधनव्यक्ती म्हणून शिवाजी विद्यापीठातील इंग्रजी अधिविभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. चंद्रकांत लंगरे यांना विशेष साधनव्यक्ती म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे. या परिसंवादामध्ये ते 'महात्मा गांधी ऑन सेल्यूलॉइड' या विषयावर विचार मांडणार आहेत.

लोकमत

# विद्यार्थ्यांनो, तुमचे भविष्य तुमच्याच हाती

कोल्हापूर : धाडस, आत्मविश्वास आणि सातत्य याच्या जोरावरच जीवनामध्ये यशस्वी होऊ शकतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनो, तुमचे भविष्य तुमच्याच हाती आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे संलग्नता विभागाचे उपकुलसचिव विलास सोयम यांनी केले. येथील देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स (स्वायत्त) येथे शनिवारी विलास सोयम यांनी 'व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर व्याख्यान दिले. यावेळी विद्यार्थ्यांना यशाची त्रिसूत्री विशद केली. प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

सकाळ




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या लोकनृत्य आणि लोकवाद्यवृंद या दोन संघांची आंतरराष्ट्रीय युवा महोत्सवासाठी निवड झाली आहे.**

# आंतरराष्ट्रीय युवा महोत्सवासाठी विद्यापीठाच्या संघांची निवड

**▶ सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३१ : शिवाजी विद्यापीठाच्या लोकनृत्य आणि लोकवाद्यवृंद या दोन संघांची आंतरराष्ट्रीय युवा महोत्सवासाठी निवड झाली आहे. बंगळूर येथील जैन युनिव्हर्सिटीत झालेल्या ३६ व्या राष्ट्रीय युवा महोत्सवात ही निवड झाली.

त्यातून विद्यापीठाच्या लोकनृत्य, लोकवाद्यवृंद संघांची ६ ते ८ एप्रिलदरम्यान लव्हली प्रोफेशनल युनिर्व्हसिटी, फगवाडा (पंजाब) येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय युवा महोत्सवासाठी निवड झाली आहे. या निवडीचे पत्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागास मिळाले. या महोत्सवात विद्यापीठाचा एकूण २६ सदस्यांचा संघ सहभागी होईल. हा संघ स्पर्धेसाठी ३ एप्रिलला रवाना होणार असून, १२ एप्रिलला परतणार आहे.

विद्यापीठ संघाचे प्रमुख म्हणून डॉ. टी. पी. शिंदे (मुधोजी महाविद्यालय, फलटण) आणि एस. ए. मोरे (वरिष्ठ सहायक, विद्यार्थी विकास विभाग) काम पाहणार आहेत. या संघाला कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.